तमसो मा ज्योतिर्गमय
आदित्य प्रतिष्ठान

वर्ष : १५ / अंक : १

# आदित्यदीप

जानेवारी ते मार्च २०२४

## || ही युगांची आरती ||

२२ जानेवारी २०२४, पौष शुद्ध द्वादशी १९४५



रामलल्ला हो प्रतिष्ठित, भाग्यशाली भारती |
ही युगांची आरती ||

श्रीरामांची आरती करताना आ. पंतप्रधान नरेन्द्र मोदी
सोबत योगी आदित्यनाथ, प. पू. मोहनजी भागवत व ब्रह्मवृंद

## श्री आदिगणेश प्रतिष्ठापनेनिमित्त सेवा



गानवंदना
गायन - सीए जितेंद्र अभ्यंकर
(गीत-संगीत-गायन)
संवादिनी - डॉ. आदित्य अभ्यंकर
तबला - अपूर्व द्रविड
टाळ - जयराज केळकर











नृत्यवंदना
मा. तेजस्विनी साठे आणि शिष्या
(अरुंधती अभ्यंकर, ईशा ओझा,
रेवा जोशी, निशिगंधा केतकर)

आदिगणेश सन्मुख गुरुदेव व सौ. अपर्णाताई,
मा. मनीषाताई साठे व शिष्या



चि. अरुंधती

## श्रीआदिगणेशाचे मनोहारी रूप



ॐ गणेश श्रीगणेश आदिगणेशा |
भक्तीने स्तवितो तुज देई आशिषा ||
प्रतिष्ठापना - दि. २७ डिसेंबर २०२३, मार्गशीर्ष कृ. प्रतिपदा, १९४५

## नारदीय कीर्तन, २२ जानेवारी २०२४
## श्रीरामांचा अतुलनीय त्याग



कीर्तनकारांचा सन्मान



भावमुद्रा



सीए. जितेंद्र - गायनसाथ



डॉ. आदित्य - गायनसाथ



आदित्य प्रतिष्ठानचे नूतन सभागृह
भाविकांनी भरून गेले.



श्रीरामसोहळ्यासाठी
सभागृहासह प्रांगणातही गर्दी उसळली होती.

जानेवारी ते मार्च २०२४ शके १९४५

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



# आदित्यदीप



कार्यकारी संपादक
**सौ. अपर्णा अभ्यंकर**

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)

संस्थापक-संपादक
**गुरुदेव शंकर अभ्यंकर**

वर्ष : १५ अंक : १

तिळगुळ घ्या गोड बोला

## अनुक्रमणिका


* श्रीगणेशस्तवन आणि श्रीरामस्तवन – गुरुदेव २
* संपादकीय - 'सौगंध रामकी खाते हैं । हम मंदिर वही बनाएँगे ।' – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर ३
* प्रवचनमाला वृत्तांत ७
* 'गृहिणी-सखी-सचिव पुरस्कार' – सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर १२
* श्रीआदिगणेशाची प्रतिष्ठापना – सौ. विशाखा निरंजन बिळगी १४
* 'इष्टापूर्त' - आदिगणेश स्थापनेच्या निमित्ताने – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर १७
* 'श्रीरामांचा अतुलनीय त्याग'-नारदीय कीर्तन – सौ. सुलभा श्रीकांत आठवले १९
* विक्रमादित्य डॉ. आदित्य अभ्यंकर – डॉ. वंदना जोशी २३
* श्रद्धांजली – डॉ. प्रभा अत्रे २४


प्रकाशक, मुद्रक, मालक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** (कार्यकारी विश्वस्त - आदित्य प्रतिष्ठान)
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
संपादक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** यांनी हे त्रैमासिक
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२ येथून प्रसिद्ध केले.
सहसंपादिका : **सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर, सौ. सुलभा श्रीकांत आठवले**
REGISTERED : RNI No. MAHMAR / 2010 / 31595



।। श्री ।।

गुरुदेव

## शंकर वासुदेव अभ्यंकर लिखित

## श्रीगणेशस्तवन आणि श्रीरामस्तवन

### श्रीआदिगणेश



ॐ गणेश, श्रीगणेश, आदिगणेशा
भक्तीने स्तवितो तुज, देई आशिषा ।।ध्रु.।।

लम्बोदर वक्रतुण्ड हे गजानना ।
गणाधीश गौरीसुत सुमुख आनना
भक्तरक्षणा धरिसी पाशअंकुशा ।।१।।

तू कर्ता तू धर्ता, हर्ता तू देवा ।
तूच ब्रह्म तू आत्मा विश्ववैभवा ।
विज्ञानासहित ज्ञान तूचि परेशा ।।२।।

कृपावंत, वरदवंत, श्रीमंगलमूर्ती ।
सकळ कला विद्यांचा नाथ गणपति ।
तू दयाळ तू कृपाळ परम श्रीयशा ।।३।।

### ही युगांची आरती



रामलल्ला हो प्रतिष्ठित, भाग्यशाली भारती
ही युगांची आरती ।।ध्रु.।।

वेदमन्त्रे ही अयोध्या जाहलीसे पावन ।
धन्य सरयु, धन्य सीता, धन्य होई लक्ष्मण ।
गगन कोंदे नादघोषे, राघवासी प्रार्थिती ।।१।।

सरून गेली पाच शतके, वेदनांचा काल तो ।
हिन्दु ऐक्या शुभवराने राम आता मण्डितो ।
उजळले सौभाग्य सारे, हनुमताचे सन्मति ।।२।।

अमृताची सुखद वेला, भाग्यक्षण हा साधत ।
नेत्र हे पाणावले गा, धन्य होता भारत ।
तमस गेला, सूर्य आला रामराज्या हा रथी ।।३।।

राष्ट्र आत्मा राम केवळ, हा युगांचा नायक ।
तिलक मङ्गल जानकी ती पातिव्रत्या दायक ।
कालचक्री विक्रमासी अतुल तो सीतापति ।।४।।

# संपादकीय

**'सौगंध रामकी खाते हैं ।**
**हम मंदिर वही बनाएँगे ।'**





अयोध्या नगरी म्हणजे कोट्यवधी हिंदूंचे जणू बलस्थान! कारण तेथे श्रीराम जन्मले. अत्यंत पवित्र आणि पावन स्थल! काशीनंतर हिंदूंना पवित्र वाटणारी स्थळे म्हणजे अयोध्या व मथुरा! परंतु हिंदू धर्माचा हा महाप्राण जणू ५०० वर्षे बंदिस्त होता.

हिंदू धर्मातील धारणेनुसार श्रीराम हे श्रीविष्णू देवतेचा ७ वा अवतार! प्राचीन भारतीय इतिहासात्मक महाकाव्य, वाल्मीकि रामायणानुसार, मर्यादा पुरुषोत्तम रामांचा जन्म अयोध्येत झाला होता म्हणून हे क्षेत्र रामजन्मभूमी म्हणून ओळखले जाते.

**पूर्वेतिहास –** रामायणाच्या कालखण्डानंतर जो ज्ञात इतिहास आहे त्यानुसार उज्जैनचा राजा विक्रमादित्य अयोध्येत आला. अत्यंत पराक्रमी विक्रमादित्याचा कालखण्ड आजपासून २२८८ वर्ष पूर्व. हेच विक्रम संवत. याच्या आधी शकांचे राज्य भारतावर होते. पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजराथ, सिंध, उत्तरप्रदेश येथे शकांनी घुसखोरी केली होती. विक्रमादित्याने या शकांना हरवून उत्तर भारतावर आपले राज्य आणले. त्याने अयोध्येत खोदकाम सुरू केलं, तेव्हा श्रीरामांचे येथेच अस्तित्व असल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले व राजा विक्रमादित्याने श्रीरामांचे मंदिर बांधले. अनेक वर्ष मंदिरात श्रीरामांची पूजा केली जात होती.

चौदाव्या शतकात मुघलांची सत्ता आली. १५२६ मध्ये मेवाडचा राणा संग्राम सिंह यांनी बाबरचा लढाईत पराभव केला. पराभवानंतर बाबरची नजर अयोध्येतील राममंदिरावर पडली त्याने आपला सेनापती मीर बाकी वर राम जन्मभूमीवरील श्रीराम मंदिर उद्ध्वस्त करून तेथे मस्जिद बांधण्याची जबाबदारी सोपवली.

अयोध्या रक्षणासाठी अक्षरश: हजारो हिंदूंनी आपले रक्त सांडले. मुसलमानांची सेना व तोफखाने सज्ज होते. यात एकूण १ लक्ष ७१ हजार हिंदू वीरांनी बलिदान दिले. पण अखेर २३ मार्च १५२८ ला मीरबाकीने अयोध्येतील श्रीराम मंदिर उद्ध्वस्त केले. आणि तेथे मशीद बांधण्यात आली. पुढे याच मशिदीला 'बाबरी ढाचा' असे नाव मिळाले.

**५०० वर्षांचा लढा –** हा काळ हिंदूंसाठी संघर्षाचाच होता. श्रीराम जेथे जन्मले ती जागाच परकीयांच्या ताब्यात गेली होती. प्रश्न राष्ट्राच्या अस्मितेचा पराक्रमाचा, स्वतंत्रतेचा, श्रद्धेचा आणि अस्तित्वाचा होता! १५२८ ते २०२३ या सुमारे ५०० वर्षांच्या काळात अनेक घडामोडी घडल्या. १५२८ ते १७३१ या कालखण्डात हिंदू आणि मुस्लिम अशा दोन समुदायांमध्ये ६४ वेळा संघर्ष झाला. १६०८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने मुघल सम्राटाकडून भारतात व्यापार करण्याचा परवाना मिळविला आणि १७६४ पर्यंत भारतात पाय रोवले. १८१८ मध्ये बाजीराव

पेशवेंचा पराभव झाला आणि मराठी सत्ता संपुष्टात आली. पंजाब पराभूत झाले, झाशी, अयोध्या इ. संस्थाने खालसा झाली आणि इंग्रजांनी भारतात सत्तेचा विस्तार केला. १८५५ मध्ये हनुमानगढी परिसरात मोठा सशस्त्र संघर्ष झाला आणि १८५९ मध्ये संपूर्ण वास्तू इंग्रज सरकारच्या ताब्यात आली. आतल्या भागात नमाज व बाहेरच्या भागात प्रार्थना असे होऊ लागले.

**पहिली याचिका –** १५ जानेवारी १८८५ मध्ये महंत रघुवर दास यांनी राम मंदिर बांधण्यासाठी पहिली याचिका दाखल केली, पण फैजाबाद न्यायालयाने ती फेटाळली. मात्र १७ मार्च ८६ ला मशिदीच्या ठिकाणी मंदिर होते हे कोर्टाने मान्य केले. हा लढा सुरूच राहिला. १९०६ पासून अयोध्येत गोहत्येला बंदी होती. १९३६ नंतर मशीद बाबरने बांधली होती का याविषयी आयुक्तांकडून चौकशीला सुरुवात झाली.

दरम्यान १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. यानंतरसुद्धा ७७ वर्षे किती झगडावे लागले तो इतिहास सुद्धा जाणून घेण्याजोगा आहे. २२-२३ डिसेंबर १९४९ मध्ये मशिदीत श्रीरामांची मूर्ती प्रगटली. दोन्ही पक्षांकडून केसेस दाखल झाल्या. १९५० मध्ये हिंदू महासभा आणि दिगंबर आखाड्यांनी वास्तूवर मालकीचा दावा केला. २६ एप्रिल १९५५ ला म्हणजे तब्बल ५ वर्षांनी मूर्ती हटवू नये असा हायकोर्टाने निर्णय सील केला.

**विश्व हिंदू परिषदेची स्थापना –** मुंबईच्या सांदीपनी साधनाशालेमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी एक सम्मेलन बोलावले. त्यांनी त्यात सांगितले की भारतातील सर्व हिंदूंनी एकत्रित येणे आवश्यक आहे. म्हणून दि. २९ ऑगस्ट १९६४ म्हणजे स्वातंत्र्यानंतर ९ वर्षांनी मुंबईत विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली आणि हिंदू जनजागरण सुरू झाले. ८ एप्रिल १९८४ मधे रामजन्मभूमी मुक्ति-यज्ञाची, आजपासून ४० वर्षापूर्वी स्थापना झाली आणि या लढ्याला अधिक बळकटी आली. या दोन घटना या मंदिर स्थापनेच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या आहेत.

जून १९८९ मध्ये भाजपच्या जाहीरनाम्यात पहिल्यांदा या मंदिर चळवळीला स्थान दिले गेले. विश्व हिंदू परिषदेने २५ कोटी निधी मंदिरासाठी गोळा करणार अशी घोषणा केली. ऑक्टोबर महिन्यात मंदिरासाठी साडेतीन लाख विटा अयोध्येत जमा झाल्या.'

संपूर्ण भारतात जनजागरणाच्या कार्यक्रमा अंतर्गत गुरुदेवांनी गोव्यात विशेष प्रवचने-व्याख्याने दिली होती.

**रामरथयात्रा –** हे आंदोलन देशभर पसरवण्यासाठी भाजपने रथयात्रेची घोषणा केली. या रथयात्रेमुळे या मोहिमेला विलक्षण गती मिळाली. ही रथयात्रा २५ सप्टेंबर १९९० या दिवशी सोमनाथपासून सुरू झाली. ज्याचे नेतृत्व करत होते भाजपाचे अडवाणीजी, जे




आत्ता ९७ वर्षांचे आहेत आणि त्यांचे साहाय्यक होते आजचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी. दोघेही खालील छायाचित्रात दिसत आहेत.

यामधे हजारो स्वयंसेवक सामील झाले. रोज ३०० कि.मी. रथ जात असे आणि ६ सभा घेतल्या जात. मोदीजींनी या यात्रेमध्ये मनोमन काय काय संकल्प तेव्हा केला असेल? श्रीरामांनाच माहीत.

२३ ऑक्टोबर १९९० मध्ये लालकृष्ण अडवाणींना बिहारमध्ये अटक झाली आणि ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालखण्डात लाखो कारसेवक अयोध्येत दाखल झाले आणि वादग्रस्त वास्तूवर भगवा फडकवला. यानंतरची २ वर्षे याचिका,

आश्वासने, स्थगिती, संरक्षक भिंत यामध्ये गेली आणि त्याचा परिणाम म्हणून ६ डिसेंबर १९९२ रोजी कारसेवेची घोषणा केली गेली. बाबरी मशीद पाडली. कारसेवकांविरोधात गुन्हे दाखल केले गेले. अडवाणी, जोशी, उमा भारती अनेकांवर गुन्हे दाखल केले गेले.

याचा परिणाम म्हणून १० डिसेंबरला रा. स्व. संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यावर केंद्र सरकारकडून बंदी घातली गेली.

**लढा सुरूच –** अयोध्येतील ६८ एकर भूखंड केंद्राकडून संपादित केला गेला. ८ सप्टेंबर १९९३ मध्ये अयोध्येबाबत लखनौमध्ये विशेष खंडपीठाची स्थापना झाली.

**कूस पालटली –** १९९८ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार आले. अटल बिहारी बाजपेयी पंतप्रधानपदी विराजमान झाले. आणि पुन्हा एकदा हिंदू जनमताने कूस पालटली. मेलेल्या समाजात जागृती आली. जे जागृत होते त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या.

या काळातच गोध्रा प्रकरण झाले. ५८ कारसेवकांना जिवंत जाळले. आणि २००४ मध्ये केंद्रात पुन्हा काँग्रेसची सत्ता आली.

**उगवता तारा –** याचवेळेला भारतीय जनता पक्षात एक खंबीर नेतृत्व उदय पावले होते. **तो उगवता तारा म्हणजे नरेंद्र मोदी.** २०१४ मध्ये देशात बहुमताने भाजपची सत्ता आली आणि मोदीजी पंतप्रधानपदी विराजमान झाले.

२१ मार्च २०१७ अयोध्येबाबत कोर्टाबाहेर तोडगा काढावा अशी सुप्रीम कोर्टाची सूचना आली.

**मोठा विजय –** ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सुप्रीम कोर्टाचा ऐतिहासिक निकाल जाहीर झाला. अनेक पुरावे तपासून वादातील जमीन रामलल्ला विराजमान समिती यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली. ५ मार्च २०२० रोजी बांधकामाचे भूमिपूजन झाले. खरे तर तेव्हा कोरोना कालखण्ड होता, पण योग्य ती खबरदारी घेऊन भूमिपूजन करण्यात आले. मा. मोहनजी भागवतांच्या उपस्थितीत मा. पंतप्रधान मोदीजींनी भूमिपूजन केले.

**भूमिपूजन**



नंतर केवळ ४ वर्षात रात्रंदिन कष्ट करून मंदिर व मूर्ती घडवली गेली. २२ जानेवारी २०२४ प्रभू श्रीरामांच्या मंदिराचे लोकार्पण मोदीजींच्या शुभहस्ते झाले.

**बालकराम मूर्ती**



**श्रीराम मंदिर**



**कसे आहे राममंदिर –** हे राम मंदिर नागर शैलीत बांधले आहे. मंदिराची पूर्व पश्चिम लांबी ३८० फूट आणि रुंदी २५० फूट आणि उंची १६१ फूट आहे. मंदिर ३ मजली आहे, प्रत्येक मजला २० फुटांचा आहे.

मंदिराला ३९२ खांब आणि ४४ दरवाजे आहेत. भूतल गर्भगृहात प्रभू श्रीरामांची बालमूर्ती स्थित आहे. ज्याची आत्ता प्रतिष्ठापना केली गेली. प्रथमतल गर्भगृहात श्रीराम राजसभा आहे. नृत्य मंडप, रंग मंडप, गूढ मंडप (सभा मंडप), प्रार्थना मंडप आणि कीर्तन मंडप असे एकूण ५ मंडप असणार आहेत. खांबावर तसेच भिंतीवर विविध देवीदेवतांचे तसेच देवांगनांच्या मूर्ती असणार आहेत.

मंदिरात ३२ पायऱ्या चढून (१६.५ फूट उंच) पूर्व दिशेच्या सिंहद्वारातून प्रवेश होईल.

दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प तसेच लिफ्टची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.

आता शेकडो वर्षांचा वाद संपून मंदिरात श्रीरामांचा अखंड जप सुरू होणार आणि अखंड नंदादीप तेवणार. **मोदीजींनी अशक्य ते शक्य करून दाखवले. या त्यांच्या कर्तृत्वाला सीमा नाही.**

असे हे भारताचे वैभव ठरावे असे मंदिर आता प्रत्येकाने दर्शन घ्यावेच असे तीर्थक्षेत्र झाले आहे. त्या अनुषंगाने अयोध्येचा परिसर, विमानतळ, रस्ते, हॉटेल्स या सर्वांची अद्ययावत निर्मिती केली आहे आणि केली जाईल. मग आपण सर्व भारतीय पुन्हा एकदा अभिमानाने म्हणू–

'सरयू तीरावरी अयोध्या
मनुनिर्मित नगरी, अयोध्या मनुनिर्मित नगरी'

* * *

---

।। श्री ।।

## ग्रंथांचे श्रीराम मंदिर

**डोंबिवली येथे १९ ते २८ जानेवारी या कालखंडामध्ये सावळाराम क्रीडासंकुलात पुस्तक आदान-प्रदान महोत्सव संपन्न झाला. येथे केवळ पुस्तकांची मांडणी करून ६२,५०० ग्रंथांपासून बनवलेले श्रीराममंदिर उभे केले गेले. त्यामध्ये पायऱ्यांवर सर्वांना दिसेल असा गुरुदेव अभ्यंकर लिखित 'भारतीय तीर्थक्षेत्रे व मंदिरे' हा ग्रंथ ठेवला गेला. आम्हा सर्वांना याचा सार्थ अभिमान वाटतो.**



# प्रवचनमाला वृत्तांत

***जानेवारी २०२४ हा नवीन वर्षातील पहिला महिना!***
***या महिन्यात गुरुदेवांच्या प्रवचनांचा विविध गावी रसकल्लोळ!***

### संत साहित्य संमेलन, पुणे
### दि. २६ नोव्हेंबर २०२३




श्री मोरया गोसावी, संत ज्ञानेश्वर माउली, संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमीत प्रथमच, निगडी प्राधिकरणाच्या वतीने, संत साहित्याच्या माध्यमातून साहित्याची मांदियाळी आयोजित केली गेली. हा सोहळा पाटीदार भवन, सेक्टर २६, गणेश तलावाजवळ, निगडी प्राधिकारण येथे दिवसभर साजरा झाला. संमेलनाचे अध्यक्षपद गुरुदेव शंकर अभ्यंकर यांनी भूषवले.

हा सोहळा तीन सत्रांमध्ये संपन्न झाला. पहिल्या सत्रात ग्रंथदिंडी, लेझीम-ढोलताशा पथकाचा कार्यक्रम, नृत्य, अग्निपूजा झाल्यावर उद्घाटन सोहळा झाला. सौ. शर्मिला महाजन यांनी प्रास्ताविक केले. ह. भ. प. किसन महाराज चौधरी गुरुजी यांना गुरुदेवांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या आणि स्वागताध्यक्षांच्या मनोगतानंतर गुरुदेव शंकर अभ्यंकर यांचे अध्यक्षीय भाषण संपन्न झाले.

अध्यक्षीय भाषणात गुरुदेवांनी प्रथमच साहित्य आणि वाङ्मय यातील फरक समजावून सांगितला. वाङ्मय अक्षय असते. शाश्वत असते. काळाच्या कसोटीवर चिरंतन असते. साहित्य मात्र अल्पजीवी असते. त्यामुळे 'संतांचे वाङ्मय' आणि 'संत वाङ्मय संमेलन' असा उल्लेख करणे योग्य. निवेदकांना हे पटले आणि पुढे 'संत वाङ्मय संमेलन' असा उल्लेख होत राहिला.

हिंदू धर्मातील प्रस्थानत्रयींचे महत्त्व सांगताना ते म्हणाले, पहिली वैदिक प्रस्थानत्रयी, दुसरी पौराणिक प्रस्थानत्रयी आणि तिसरी संतांची प्रस्थानत्रयी. संतांच्या प्रस्थानत्रयीमध्ये माउलींची ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, समर्थांचा दासबोध, तुकोबांचा गाथा यांचा समावेश होतो. याचा अभ्यास व मनन, चिंतन केले तर आयुष्य कृतार्थ होऊन जाते. संतांनी केवळ ईश्वर भक्ती शिकवली नाही. शक्तीचे सामर्थ्य पण अधोरेखित केले.

समारोप सत्रात स्थानिक संत साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### आदिगणेश प्रतिष्ठापना महोत्सव
### दि. २५ ते २७ डिसेंबर २०२४

आदित्य प्रतिष्ठानच्या पसायदान वास्तूत झालेल्या या महोत्सवाचा वृत्तांत पृ. १४ वर दिला आहे.

### श्रीमद्भगवद्गीता
### श्रीशांतादुर्गा संस्थान, गोवा
### दि. २ ते ६ जानेवारी २०२४



श्रीशांतादुर्गा देवी, कवळे, गोवा येथे दि. २ ते ९ जानेवारी नवचंडी याग संपन्न झाला. यजमान होते



श्री. शिरीष गायतोंडे आणि यज्ञ ज्यांच्याद्वारा संपन्न झाला ते होते श्री. कुमार सरज्योतिषी. श्री. कुमार यांची तीव्र इच्छा होती की या कालखण्डात गुरुदेव शंकर अभ्यंकरांची प्रवचने व्हावीत. अनेक कार्यक्रमांच्या धावपळीत २ ते ६ जानेवारी हा कालखण्ड उपलब्ध झाला आणि गीतेवरची प्रवचने करायचे योजले गेले. ५ दिवसात गीता सांगणे म्हणजे अक्षरश: 'गागरमें सागर' सामावण्यासारखे होते. परंतु गुरुदेवांनी ५ दिवसात गीतेचे तत्त्वज्ञान साररूपाने कथन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. श्रीराम आणि श्रीकृष्ण, मध्यभागी गुरुदेवांचे आसन, शेजारी श्रीशांतादुर्गेचे मंदिर, शोभिवंत मंडप असे प्रसन्न वातावरण होते. संत विद्यापीठाची संकल्पना सर्व श्रोत्यांनी उचलून धरली. गोव्यातील केंद्रीय पर्यटन मंत्री श्री. श्रीपाद नाईक हे सांगतेच्या प्रवचनाला पूर्ण वेळ उपस्थित होते. सर्व श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती. प्रतिष्ठानच्या कक्षाला उत्तम प्रतिसाद लाभला. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते श्री. मकरंद पंडित आणि सौ. वृषाली पंडित यांनी कक्ष उत्तमरितीने सांभाळला.

**ब्राह्मण महासंघ, गोमंतक**
**दि. ७ जानेवारी २०२४**




गोव्यातील केरी येथे ब्राह्मण महासंघाचा वार्षिक महामेळावा येथे संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून गुरुदेवांना निमंत्रित केले होते. गुरुदेवांनी ब्राह्मण्य म्हणजे काय, ब्राह्मणांचे प्रकार, ब्राह्मणांनी कोणते गुण धारण करावेत, सध्याच्या काळात ब्राह्मणांनी देशाला कसे योगदान द्यावे आणि एकत्र येऊन आत्मोन्नती व देशोन्नती कशी साधावी यावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले. श्रोते मंत्रमुग्ध झाले.

**स्वच्छंदानंद पुण्यतिथी, पुणे**
**दि. १० जानेवारी २०२४**




श्रीमती मनीषा साठे व कै. राजस साठे यांचे आध्यात्मिक गुरु स्वच्छंदानंद यांची पुण्यतिथी संकल्प कार्यालयात संपन्न झाली. त्या मंगल दिनी गुरुदेव अभ्यंकरांचे रामचरित्रावर प्रवचन होते. वनवासगमन, श्रीरामांचा पराक्रम, रामचरित्राची मोहिनी, रामायणाचा कालखण्ड, वालीनिर्दालन, समुद्रसेतू हे सर्व ऐकताना सर्व भाविक श्रोते जणू त्या कालखण्डात गेले होते आणि तल्लीन झाले होते.

**श्रीमद् भागवत कथा**
**नेहरू मैदान, डोंबिवली (पूर्व)**
**दि. १३ ते १९ जानेवारी २०२४**

शिवसेनेच्या डोंबिवली शहर शाखेने डोंबिवली (पू.) येथील नेहरू मैदानावर १३ ते १९ जानेवारी २०२४ असे सात दिवस भागवत सप्ताहाचे आयोजन केले होते. या प्रवचनमालेसाठी डोंबिवली (प.) येथे



राहणाऱ्या श्रीमती लळीत यांनी उदारहस्ते ५ लाख रुपयांची देणगी दिली आणि डोंबिवलीत भागवत सप्ताह करण्यासाठी गुरुदेवांकडे आग्रह धरला होता. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी गुरुदेवांना डोंबिवलीतील प्राचीन गणेश मंदिरापासून नेहरू मैदानातील प्रवचन मंडपापर्यंत ढोलताशा पथकासह वाजतगाजत आणण्यात आले. डोंबिवली शाखेचे अध्यक्ष श्री. राजेश गोवर्धन मोरे यांच्या सहकार्याने श्री. तात्याराव गंभीरराव यांनी या प्रवचनमालेचे नेटके आयोजन केले होते.

गुरुदेवांनी भागवत सप्ताहात मांडलेले काही महत्वपूर्ण विचार असे :

१) भागवत महापुराण हे एकूण अठरा महापुराणांपैकी एक आहे. त्यात १२ स्कंध आणि १८,००० श्लोक आहेत. त्यापैकी ११व्या स्कंधात 'उद्धवगीता' म्हणजे भगवंतांनी उद्धवाला केलेला उपदेश असून ते भागवताचे सार आहे. म्हणून संत एकनाथांनी भागवताच्या फक्त ११व्या स्कंधावर टीका ग्रंथ लिहिला.

२) सामान्य मनुष्य सात प्रकारच्या वासना घेऊन जन्माला येतो. त्या सर्व वासना नष्ट करण्याचे सामर्थ्य भागवत महापुराणात आहे.

३) मनुष्याचे प्रारब्ध अतितीव्र, तीव्र, मध्यम व मंद असे चार प्रकारचे असते. संत किंवा सिद्ध पुरुष कर्मविपाकात म्हणजे प्रारब्धात ढवळाढवळ करत नाहीत. ते एखाद्या माणसाचे फक्त मंद प्रारब्ध बदलू शकतात आणि त्यांना वाटले तरच बदलतात. अन्य प्रकारचे प्रारब्ध हे माणसाने शांतपणे भोगूनच संपवावे.

४) माणसाने कर्म करताना ३० पथ्ये पाळावीत. ती पाळली नाहीत तर मरणोत्तर दुःख वाट्याला येते.

५) नित्य, नैमित्तिक कर्मे निष्कामपणे करावीत तर निषिद्ध व काम्य कर्मे करूच नयेत म्हणजे प्रायश्चित्त घेण्याची वेळच येणार नाही.

६) साधना, उपासना करणाऱ्या माणसाने नित्य क्षमाशीलच असावे. हिरण्यकश्यपूने प्रह्लादाला अनेकवेळा जीवे मारण्याचा प्रयत्न केला पण तरीही त्याने हिरण्यकश्यपूला क्षमाच केली.

७) अध्यात्मविद्येच्या अभ्यासाला कुमार वयातच सुरुवात करावी. त्यादृष्टीने उपनयन संस्कार अत्यंत महत्वाचा आहे.

८) सर्व नात्यांमध्ये पती-पत्नीचे नाते सर्वोत्तम आहे. पुढील पिढी चांगली घडण्यासाठी गर्भसंस्कार अनिवार्य आहेत.

९) श्रीराम हे राष्ट्रनिर्माते होते. ते मर्यादा पुरुषोत्तम असल्याकारणाने प्रापंचिकांनी त्यांचेच अनुकरण करावे. श्रीराम व त्यांची भावंडे ही सावत्र असूनदेखील त्यांचे एकमेकांवर सख्ख्या भावांप्रमाणे प्रेम होते. म्हणून सर्व भावडांनी त्यांचाच आदर्श डोळ्यापुढे ठेवावा. श्रीराम



पूर्ण शाकाहारी होते. त्यांनी वनवासात फक्त फळे, कंदमुळे सेवन केली. त्यांनी कधीही मांसाहार केला नाही.

१०) भगवान श्रीकृष्ण हे पूर्णावतार असल्याकारणाने त्यांच्या लीला फक्त गायच्या. त्यांचे अनुकरण करायचे नाही.

डोंबिवलीत अनेक वर्षांनी गुरुदेवांची प्रवचनमाला झाली म्हणून जुन्या श्रोत्यांना विशेष आनंद झाला. डोंबिवलीकरांनी गुरुदेवांच्या भागवत सप्ताहाला इतका उदंड प्रतिसाद दिला की शेवटचे तीन दिवस आसनव्यवस्था अपुरी पडली. गुरुदेवांचे ग्रंथ, पेनड्राईव्ह यांनाही श्रोत्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

आदित्य प्रतिष्ठानचा कक्ष ठाण्याहून येऊन आदित्यव्रती केदार केळकर, वैदेही केळकर, शर्वरी चासकर, कौस्तुभ दामले यांनी उत्तम रितीने सांभाळला. ठाण्याचा आदित्यव्रती हनुमान, त्याची पत्नी व पुत्र यांनीही उत्तम सहकार्य केले.

## राष्ट्रनिर्माते प्रभू रामचंद्र
## दि. २० जानेवारी २०२४




अयोध्या येथे होणाऱ्या श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा या ऐतिहासिक मंगल सोहळ्याची अनुभूती ठाणेकरांना देण्यासाठी सृजन संपदा संस्थेच्या माध्यमातून माजी खासदार भाजपचे राष्ट्रीय नेते डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि प्रदेश भाजप प्रवक्ते सुजय पत्की यांच्यातर्फे गावदेवी मैदानात दि. २० ते २२ जानेवारी २०२४ दरम्यान 'रामायण महोत्सवा'त विविध कार्यक्रम सोहळा आयोजित केला होता.

गुरुदेव शंकर अभ्यंकर ह्यांचे २० जानेवारी २०२४ रोजी 'राष्ट्रनिर्माते प्रभू श्रीराम' या विषयावर प्रवचन आयोजित केले. सामुहिक रामरक्षा पठणानंतर गुरुदेवांच्या प्रवचनास सुरुवात झाली. श्रोत्यांच्या प्रचंड गर्दीमुळे मैदान अपुरे पडले.

गुरुदेव म्हणाले, 'रामायणाचा कालखंड सात ते आठ हजार वर्षापूर्वीचाच असूनही ऐतिहासिकता सिद्ध करण्याचा सर्वश्रेष्ठ व प्रधान पुरावा म्हणजे 'वाल्मीकि रामायण' होय. त्यात 'रामायण हा इतिहास आहे' असे सुस्पष्टपणे सांगितले आहे. श्रीरामांच्या चरित्राला, पुरुषार्थाला व त्यागाला जगात तोड नाही. श्रीरामांनी भरताला राजधर्म शिकविला. पाच संस्कृतींचा समन्वय करून, प्रभू रामचंद्र राष्ट्रनिर्माते ठरले.'

दि. २२ जाने. २०२४ ला रामज्योती प्रज्ज्वलित करून श्रीरामांना वंदन करून आ. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना दंडवत घालून मंदिर प्रतिष्ठापना दिवस साजरा करण्यास सांगितले. श्रीरामांचे चरित्र जगाने शिरोधार्य करावे असे गुरुदेवांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले.

## राष्ट्रनिर्माते प्रभू रामचंद्र
## गिरीश खत्री मित्र परिवार, पुणे
## दि. २१ जानेवारी २०२४



अयोध्यानगरीमधील श्रीराम मंदिराच्या प्राण-प्रतिष्ठापनेच्या निमित्ताने 'राष्ट्र प्रथम' संकल्पना सिद्धीसाठी स्वस्तिश्री सोसायटी व गिरीश खत्री परिवार, कर्वेनगर,

पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदेव शंकर अभ्यंकर यांचे 'राष्ट्रनिर्माते प्रभु श्रीरामचंद्र' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि. २१ जानेवारी २०२४ रोजी स्वस्तिश्रीचे मैदान श्रोत्यांनी फुलून गेले होते. पालकमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील हे उपस्थित राहिले.

'संपूर्ण भारताकरिता प्राणप्रतिष्ठेचा दिन हा अत्यंत गौरवाचा क्षण आहे. हा अद्वितीय, अलौकिक सुवर्णक्षण उंबरठ्यावर थांबलेला आहे. श्रीराम उद्या प्राणप्रतिष्ठेने सन्मानित होत आहेत, हे आपणा सर्वांचे सद्भाग्य होय.' या शब्दांत गुरुदेवांनी या दिनाचे माहात्म्य वर्णन केले.

श्रीरामांच्या सद्गुणांनी आणि आदर्श चरित्राने भारतीयांचे आयुष्य घडले आहे. आदर्श बंधू, पुत्र, पती, क्षत्रिय इत्यादी विविध भूमिका जगलेले श्रीराम हे ऐतिहासिक पुरुष आहेत. रामकथा ही संपूर्ण भारत वर्षाला वेढून पुन्हा दशांगुले उरलेली आहे, इतके व्यापक आणि सखोल स्वरूप रामकथेचे आहे. श्रीरामांनी शाश्वत जीवनमूल्ये धारण केली व ती प्रत्यक्ष आचरणात आणली. रामकथा हा एक अमृतमयकलश आहे. या अमृतसिंचनाने भक्तिरसात न्हाऊन सर्वजण धन्य होतात. आत्मबल, आत्मनिष्ठा, श्रद्धा इत्यादी विविध शाश्वत मूल्यांचे दर्शन श्रीरामचंद्रांच्या चरित्रातून घडते.

राममंदिरात होणारी 'रामलल्लाची' प्रतिष्ठापना हा भारताच्या अस्मितेचा हुंकार असून आपणा सर्वांना आत्मगौरवाचा प्रत्यय देणारी ही घटना आहे. यामुळे संपूर्ण इतिहास उजळून निघाला आहे. श्रीराममंदिर हे राष्ट्रमंदिर आहे हे विशद करून जोपर्यंत पृथ्वीतलावर सूर्य, चंद्र, नद्या इ. अस्तित्वात आहे तोपर्यंत नि:संशयपणे श्रीरामचंद्रांची कथा अजरामर आहे! या शब्दात श्रीरामांचे चरित्र व कार्य गुरुदेवांनी आपल्या ओजस्वी वाणीतून गौरविले. सर्व श्रोत्यांना रामचरित्राचे, राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत नेमक्या व नेटक्या शब्दयोजनेतून गुरुदेवांनी प्रबोधन केले. यानंतर श्रीरामांची आरती केली गेली. खत्री परिवाराने शिरा व शबरीस्वरूप बोरे प्रसाद म्हणून भाविकांना दिला.

* * *

## डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे उद्बोधक व्याख्यान

डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे श्रीराम प्रतिष्ठापनेनिमित्त दि. २१ जाने. २०२४ रोजी DSPPL (Devrukh Spiritual Prowess Private Ltd.) यांच्यातर्फे उद्बोधक व्याख्यान झाले. त्यांचा विषय होता, 'दाशरथी रामचरित्र से दस गुण'

डॉ. आदित्य यांनी साधकाच्या दृष्टीने आचरण्यासारखे दाशरथी श्रीरामांचे दशगुण वर्णन केले. जिज्ञासा, धैर्य-धर्मपरता, पितृभक्ती, नीती, वाक्चातुर्य, मनुष्यपरीक्षा, युद्धकौशल्य, एकत्व, परिवारिक वृत्ती आणि राष्ट्रनिर्मितीची आस हे गुण होत. रामायणातील नेमके प्रसंग सांगून त्यांनी श्रीरामचरित्र श्रोत्यांच्या मनावर ठसविले.

डॉ. आदित्य यांच्या व्याख्यानात आणि वाणीमध्ये प्रगल्भतेबरोबरच सहजताही होती. श्रीरामांचे सद्गुण प्रत्यक्ष आयुष्यात आचरता येऊ शकतात असा विश्वास ऐकणाऱ्यांच्या मनात निर्माण करणारे हे भाषण होते. विशेष म्हणजे हे व्याख्यान हिंदीतून झाले आणि त्या भाषेवर असलेले त्यांचे प्रभुत्व प्रत्ययाला आले. त्यातून त्यांच्या या विषयावरील असलेल्या सखोल अभ्यासाचे प्रत्यंतर सर्वांना आले.

# ‘गृहिणी-सखी-सचिव पुरस्कार अपर्णाताईंना!’

***आदित्य प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त सौ. अपर्णाताई अभ्यंकर यांना गदिमा प्रतिष्ठानचा ‘गृहिणी-सखी-सचिव’ पुरस्कार घोषित केला गेला आणि कार्यकर्त्यांमध्ये आनंदाची लहर उसळली. प्रतिवर्षी गदिमांच्या पत्नी विद्याताई माडगूळकर यांच्या नावे हा पुरस्कार ज्या स्त्रियांनी कर्तृत्ववान पुरुषांना कर्तृत्ववान साथ दिली अशा स्त्रियांना दिला जातो. १४ डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या समारंभाचा हा वृत्तांत.***

**– सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर**




१४ डिसेंबर २०२३ या दिवशी गदिमा प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा ‘गृहिणी-सखी -सचिव’ पुरस्कार सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर यांना प्रदान करण्यात आला. टिळक स्मारक मंदिरात हा सोहळा संपन्न झाला. अध्यक्ष स्थानी होते उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल श्री. राम नाईक.

गदिमा म्हणजे ज्येष्ठ, श्रेष्ठ कवी, गीत-पटकथा-संवाद लेखक आणि गीतरामायणकार! त्यांच्या नावाने मंडित असलेल्या प्रतिष्ठानकडून मिळणारा हा पुरस्कार तितकाच मानाचा! हा पुरस्कार जाहीर झाला आणि सगळेच म्हणू लागले की अगदी योग्य व्यक्तीला हा पुरस्कार मिळतोय. सौ. अपर्णा वहिनींची कामगिरी आहेच तशी! गेली ४९ वर्षे गुरुदेवांची पत्नी या नात्याने त्यांनी उत्तम रितीने गृहिणीपद सांभाळले आहे. सासू-सासऱ्यांची सेवा, एकुलती एक मुलगी म्हणून आई वडिलांची सेवा, जितेंद्र-आदित्यची आई, मधुरा-आरतीच्या ‘अहो आई’ अरुंधती, अर्जुन, अद्वैतची आजी या नात्याने घरातील कार्ये, सण-व्रत-वैकल्ये साजरी करणे यातून त्यांच्यातील सक्षम गृहिणी सगळ्यांनाच अनुभवाला येते आहे.

वैयक्तिक संसार करत असतानाच गुरुदेवांनी सुरू केलेला आदित्य प्रतिष्ठानचा संसार त्या गेली ४० वर्षे जबाबदारीने, अखंडपणे सांभाळत आहेत. दोन्हीमध्ये येणाऱ्या अडचणींना तोंड देण्याची क्षमता त्यांनी सक्षमपणे सिद्ध केली आहे. प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त, गुरुदेवलिखित सर्व ग्रंथांच्या मुद्रणप्रती तपासणे, आदित्यदीप त्रैमासिकाच्या संपादिका, ‘विष्णुसहस्रनाम’ ग्रंथाच्या लेखिका, पठण समूह तयार करून सर्वांना स्तोत्र पठणाची गोडी लावण्यात आणि प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या तसेच

कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शिका म्हणून त्या यशस्वी ठरल्या आहेत.

लोकशिक्षण आणि संस्कृती संवर्धनासाठी होणाऱ्या गुरुदेवांच्या प्रवचनमाला-कीर्तने ठरविणे, संयोजकांशी बोलणे, त्यांना या कार्याचे महत्त्व समजावणे, कार्यक्रम सुनियोजित कसा करावा याचेही मार्गदर्शन त्या उत्तम प्रकारे करतात. प्रतिष्ठानमध्ये साजरे होणारे उत्सव शास्त्रशुद्ध पद्धतीने, नेटकेपणाने करण्यात त्यांचा उत्साह अनुकरणीय असतो.

अशा प्रकारे गृहिणी म्हणून स्वत:चा संसार आणि सचिव म्हणून प्रतिष्ठानचा संसार करणाऱ्या वहिनींना-

'भस्म विलेपित रूप साजिरे
आणुनिया चिंतनी
अपर्णा तप करिते काननी'

या ओळी चपखल लागू पडतात.

१८ दिवसांची गीता प्रवचनमाला करावी, श्रद्धेय यात्रेकरूंना तीर्थपर्यटनाला न्यावे आणि त्यांना गुरुदेवांकडून तीर्थयात्रेचे माहात्म्य सांगावे या कल्पना वहिनींच्याच ! तशी इच्छा गुरुदेवांजवळ व्यक्त करून त्यांची अनुमती मिळवणे, गुरुदेवांच्या अपेक्षा कार्यकर्त्यांना योग्य शब्दात सांगणे, कार्यकर्त्यांच्या आशंका गुरुदेवांपर्यंत पोहचविणे हे करताना त्यांच्या सखित्वाची परीक्षा असते आणि वहिनी त्या परीक्षेत उत्तम रितीने उत्तीर्ण होतात. आजपर्यंत १८ दिवसांच्या गीतेच्या झालेल्या १४ प्रवचनमाला आणि १७ यशस्वी तीर्थपर्यटन यात्रा हेच सिद्ध करतात. हे करताना येणाऱ्या अनंत अडचणींना वहिनी शांतपणे सामोऱ्या जातात.

सत्कार समारंभात निवेदकाने गदिमांच्या ओळी उद्धृत केल्या,

'डोळ्यापुढे दिसे ग मज चित्र ते सजीव
माझ्या घरातील तू गृहिणी-सखी-सचिव'

'प्रज्ञावंत व्यक्तीची गृहिणी-सखी-सचिव या भूमिका अपर्णाताईंनी समर्थपणे पेलल्या आहेत' असे निवेदकाने सांगताच सभागृहात टाळ्यांचा गजर झाला. गदिमांच्या पत्नी विद्याताई माडगूळकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा हा पुरस्कार यापूर्वी सुनिता देशपांडे, साधनाताई आमटे, विजया राजाध्यक्ष, सुलभा देशपांडे यांना दिलेला आहे.

पुरस्कार स्वीकारताना वहिनींनी व्यक्त केलेले मनोगत सर्व उपस्थितांना खूपच आवडले. त्यांचे संयत-सस्मित-प्रांजळ बोलणे, तसेच आजोबा, आजी, आई, वडील, गुरुदेव यांच्या सहवासात आपण कशा घडलो हे सांगण्यातून त्यांचा विनम्र भाव व्यक्त करणारे होते. आपण सर्वांनी ते ऐकले असेलच. नसेल तर यू ट्यूबवर अवश्य ऐकावे.

प्रतिष्ठानच्या रौप्य महोत्सवी अंकात (मोगरा फुलला) आम्ही अपर्णा वहिनींवर एक लेख दिला होता शीर्षक होते– 'गृहिणी-सचिव-सखी'.

वहिनींचे हे रूप आम्ही जाणले होतेच. त्यावर या पुरस्काराने शिक्कामोर्तबच केले जणू! आम्हा कार्यकर्त्यांना याचा विशेष आनंद आहे, अभिमान आहे! आम्ही सारेच म्हणतोय,–

आप्तस्वकीया आज होतसे आनंद अतीव
पुरस्कृत तुम्ही जाहला 'गृहिणी-सखी-सचीव'।
'गृहिणी' म्हणुनी जपले सर्वा आदर, प्रेमाने
समाजपरिवाराही बांधले सांघिक कौशल्याने ।
संस्कृतिसंवर्धन कार्यी व्यस्त असे नित पती
'सखी' होऊनी आपण देता सत्कार्याला गती ।
चार दशके कार्य जाहले शतवर्षासम भरीव
या सत्कार्यी तुम्ही जाहला समर्थ, सक्षम 'सचिव'।
पतिकार्यी अर्पण केले सर्वस्व अपर्ण वृत्तीने
उंची लाभली पुरस्कारा तव कार्यकुशलतेने ।
आप्तस्वकीया आज होतसे आनंद अतीव
पुरस्कृत तुम्ही जाहला 'गृहिणी-सखी-सचिव ।

* * *

# श्रीआदि गणेशाची प्रतिष्ठापना

## (दि. २७ डिसेंबर २०२३)

– सौ. विशाखा निरंजन बिळगी

आदित्य प्रतिष्ठानच्या कार्यालयीन कामकाजासाठी बांधलेली नूतन तीन मजली इमारत- पसायदान! प्रांगणामध्ये सुरेख गणेश मंदिर, पहिल्या मजल्यावर कार्यालय, दुसऱ्या मजल्यावर ग्रंथालय, तिसऱ्या मजल्यावर कार्यक्रमांसाठी व्यासपीठ असलेले सभागृह व चौथ्या मजल्यावर मोकळी गच्ची अशी सुंदर इमारत उभारली आहे.




दि. २५ ते २७ डिसेंबर २०२३ रोजी वास्तूमधील जयपूर पिंकस्टोननी बांधलेल्या मंदिरात श्रीगणरायाच्या संगमरवरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना झाली. हा सगळा सोहळा अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने दहा ज्ञानवंत ब्रह्मवृंदांच्या हस्ते सातारचे वेदमूर्ती श्री. विवेकशास्त्री गोडबोले यांच्या आधिपत्याखाली संपन्न झाला. यजमानपदी अर्थातच आपले आदरणीय, शुद्ध, सत्त्वाचरणी दंपती गुरुदेव व सौभाग्यवती अपर्णाताई होते. त्यांची बुद्धिमान व कर्तबगार मुलं सीए जितेंद्र व डॉक्टर आदित्य तसेच कर्तव्यतत्पर सुना सौ. मधुरा व सौ. आरती संपूर्ण कार्यक्रमात हिरिरीने सहभाग घेऊन कार्य करत होत्या. चि. अरुंधती, अर्जुन व अद्वैत या तीनही नातवंडांनी आपल्या परीने सर्व मदत केली. आदित्य प्रतिष्ठानच्या नि:स्पृह कार्यकर्त्यांनी आपल्याला दिलेली प्रत्येक जबाबदारी अत्यंत श्रद्धेने, तळमळीने आणि उत्साहाने पार पाडली.

पहिल्या दिवशी दि. २५ डिसेंबर. गुरुजींनी सर्वच उपस्थितांना हा समारंभ किती महत्त्वपूर्ण व क्वचित घडणारा असून त्याची रूपरेखा सांगितली. पूजेमध्ये केले जाणारे विधी व म्हटले जाणारे मंत्र याची माहिती दिली. प्रत्येकाचा सहभाग कसा असावा तर गणपतीसारखे सुपाएवढे कान करून श्रवण भक्ती करावी, बारीक नजरेने काळजीपूर्वक लक्ष देऊन सर्व पूजाविधी टिपावेत आणि बुद्धीने त्याचे मनन-चिंतन करून श्रद्धेने तीन दिवस होणाऱ्या विधींमध्ये सहभागी व्हावे.

प्रथम दिवशी पुण्याहवाचन, नवग्रहांचे पूजन, सत्त्व-रज-तम गुणांचे तीन रंग दर्शवणाऱ्या सर्वथा रुद्र ग्रहमंडलाचे पूजन, नांदी श्राद्ध व अरणीमधून अग्नी प्रज्वलित करून यज्ञवेदीचे पूजन केले.

गुरुदेव दंपतीने प्रारंभ केला व पुढे त्यांच्या सुपुत्रांनी व मग गुरुजींनी अरणीमधून घर्षणाने अग्निनारायणास प्रसन्न केले. या समयी गोडबोले गुरुजींनी (समुद्रात वडवानल, पिंपळ वृक्षात अग्नी कसा स्थित झाला त्या संबंधीची एक कथा सांगितली.)

आपल्याकडून नकळत काही अपराध घडत असतात. त्यांचे प्रायश्चित्त घेण्याचा आणि यापुढे सात्त्विक आहार-विहार-विचारच ठेवू असा संकल्प

करण्याचा विधीही गुरुजींनी करून घेतला. गणेशाला आवाहन करण्याची पात्रता आपल्यामध्ये आणायची हा उद्देश गुरुजींनी समजावून सांगितला. प्रातिनिधिक स्वरूपात छोट्या मूर्तीला वाजत गाजत प्रथम प्रांगणात आणले.

कारागिरांनी अत्युत्तम कौशल्याने व गुरुदेवांच्या मनाप्रमाणे घडवलेल्या आरसपानी मूर्तीला पाहायची उत्कंठा सर्वांच्याच मनात दाटून होती. ८० किलो वजनाची गणरायांची मूर्ती वाजत गाजत प्रांगणात आणली. अक्षता, फुले वाहून स्वागतार्ह पूजा केली व त्यानंतर मूर्तीचा जलनिवास व धान्यनिवास झाला. एका भल्या मोठ्या फुलांनी सजवलेल्या पितळी पातेल्यामध्ये मूर्तीला ठेवून त्यावर सर्व उपस्थितांनी, गुरुजी मंत्र म्हणत असताना जलाभिषेक केला. त्यानंतर मूर्तीला बाहेर काढून स्वच्छ पुसून कापसाच्या गादीच्या मऊ बिछान्यावर झोपवले व त्यावर ७५ किलो तांदुळाचा अभिषेक करून त्या तांदुळामध्ये, सौ. आरतीने विणलेल्या मोठ्या लोकरीच्या शालीमधे मूर्ती लपेटून ठेवली. अशा पद्धतीने प्रथम दिवशीच्या सकाळी आठच्या सुमारास सुरू झालेला पूजाविधी, दोनच्या सुमारास संपन्न झाला. त्यानंतर सर्वांनी 'पायस' प्रसादाचे भोजन घेतले.

आपण काहीतरी वेगळाच अनुभव घेत आहोत ही जाणीव प्रत्येकाला झाली आणि दुसऱ्या दिवशीची उत्कंठा अधिकच वाढली.

दुसरा दिवस दि. २६ डिसेंबर, मार्गशीर्ष महिना, दत्त जयंतीचा दिवस, त्यात मंगळवार, सारे वातावरण मांगल्यपूर्ण! सकाळी बरोबर आठ वाजता विशेष होम विधीस प्रारंभ झाला.

वेदातील अत्यंत श्रवणीय व मंगल नाद निर्माण करणारी अर्थपूर्ण सामे गाऊन गोडबोले गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पवित्र असे हवन केले. त्यावेळी त्यांनी फार महत्त्वाची माहिती सर्वांना सांगितली आणि त्यामुळे या विधींचे महत्त्व आणि माहात्म्य सर्वच कळले. तसेच नवग्रहांचे पूजन व स्थापन का करायचे हे सुद्धा गुरुजींनी सविस्तर सांगितले.

दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम असाच दुपारी दोनच्या सुमारास पूर्ण झाला व त्यानंतर सर्वांचे 'पुरणपोळीच्या' प्रसादाचे भोजन झाले.

आता उत्सुकता लागून राहिली ती उद्याच्या कार्यक्रमाची, प्राणप्रतिष्ठापनेची!

तिसरा दिवस दि. २७ डिसेंबर प्राणप्रतिष्ठापनेचा! वातावरणात वेगळीच ऊर्जा, प्रसन्नता, उत्साह व पावित्र्य जाणवत होते. मंद वाऱ्याच्या लहरींनी हलणारी मंडपाची झालर वायुदेवतेचे अस्तित्व सांगत होती. उपस्थित आमंत्रितांची, मान्यवरांची, आपल्या घरचेच कार्य असल्याने हौसेने सहभागी झालेल्या आदित्यव्रतींची लगबग पाहता लग्नसमारंभच असावा असे वाटत होते. निद्रा घेणाऱ्या गजाननाला सौ. अपर्णावहिनींसह सर्वांनी गोड भूपाळ्या म्हणून जागे केले. आदिगणेशाची प्रसन्न मूर्ती मंदिरात स्थापित झाली. आणि खरोखरच काही विधी झाल्यावर गुरुजींनी गुरुदेव दंपती व गणरायाच्या सुप्रतिष्ठित झालेल्या मूर्तीमध्ये सुरेखसा, गुलाबी रंगाचा, जरतारी अंतरपाट धरला. समस्त मंडळी एका बाजूस उभी राहून हातात अक्षता घेऊन गुरुजींच्या खड्या आवाजातील मंगलाष्टकांना हुरहुरत्या भावनेने कानात साठवत होती. साक्षात गणराय आणि भक्त शिवपार्वती यांचे अद्वैत जुळणार होते तो हा क्षण! श्री. शंकर व सौ.अपर्णाच्या हस्ते गणेश स्थापना! आम्ही सर्वांनी सुमुहूर्तावर अक्षता टाकून श्रीगणेशाला वंदन केले.

त्यानंतर गुरुदेवांनी मूर्तीच्या प्रत्येक अवयवात गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे आपल्या श्वासातून प्राण फुंकले आणि सर्व भक्तगणांनी त्यावेळी ओंकार केला व अशारितीने प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली. गुरुदेवांनी गणेशाचे नामकरण केले. आदित्य

प्रतिष्ठानचा गणपती म्हणून तो 'आदि गणेश'- 'ओम नमोजी आद्या' अशा अर्थाने तो आदि गणेश! ह्या मंगल समयी एका आदित्यव्रती भगिनीनी, घरी केलेल्या पेढे मोदकाचा प्रसाद देऊन सर्वांचे तोंड गोड केले.

मंदिरावर कळस चढवणे व त्यावर ध्वज लावणे हे महन्मंगल कार्य मात्र आणि मात्र ब्रह्मचारी व्यक्तीच करू शकते, असे शास्त्र सांगते. त्यासाठी सज्जनगडावरून स. भ. योगेशबुवा रामदासी यांना पाचारण करण्यात आले व त्यांच्या हस्ते मूषक असलेला भगव्या रंगाचा ध्वज फडकवला गेला. आणि अधिकृतरित्या मंदिर स्थापनेची घोषणा गुरुदेवांनी केली. सर्वांनी आरती गायली.

श्रीगणरायाचे पूजन व स्वागत कसे करायचे तर शब्दांनी, संगीताने व नर्तनाने! म्हणून सीए जितेंद्र अभ्यंकरांनी स्वरचित, स्वसंगीतबद्ध केलेल्या अत्यंत गोड व अर्थपूर्ण अशा तीन रचना सादर केल्या. त्यावर संवादिनीची साथ डॉ. आदित्य अभ्यंकरांनी दिली तर तबल्यावर श्री. अपूर्व द्रविड आणि टाळ वादन श्री. जयराज केळकरांनी केले.

ज्येष्ठ कथक नृत्यांगना मनीषाताई साठे यांच्या शिष्या व स्नुषा तेजस्विनीताई साठे व त्यांच्या जोडीला त्यांच्या शिष्या ईशा ओझा, रेवा जोशी, निशिगंधा केतकर व अरुंधती अभ्यंकर यांनी कथक नृत्यातून अप्रतिम गणेश वंदना सादर केली. याप्रसंगी सादर केलेल्या सर्वच रचना अर्थपूर्ण व भक्तीपूर्ण होत्या. विशेषत: माउलींचा अभंग अत्यंत आर्त होता व तितक्याच समर्थपणे त्याचा आविष्कार घडवला गेला.

या स्वर, संगीत व नृत्याविष्कारानंतर ब्रह्मवृंदाचे, रामदासींचे, विशेष अतिथींचे, मान्यवरांचे सत्कार गुरुदेव दंपतीच्या हस्ते झाले.

कोरोनामुळे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना गुरुदेवांची पंचाहत्तरी साजरी करता आली नव्हती. ती रुखरुख सर्वांच्या मनात होती. म्हणून आदित्य प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी ७५ गुलाबांचा पुष्पगुच्छ व प्रतिष्ठानच्या कार्यास **७५ हजार रुपयांची थैली** देऊन गुरुदेवांच्या पंचाहत्तरीनिमित्त त्यांचा तसेच गुरुपत्नी आणि प्रतिष्ठानच्या सर्वच कार्यात विशेषत्वाने सचिव असलेल्या अपर्णाताईंचा साडी व ओटी भरून कृतज्ञतेने विशेष सन्मान केला. त्यांचे आशीर्वाद प्राप्त केले.

गणरायांसाठी आज मोदकांच्या विशेष नैवेद्याचा महाप्रसाद केला गेला. तिन्ही दिवस नाश्ता, भोजन हे कांदा-लसूण विरहित असे सात्त्विक होते. सर्व अतिथीगण तृप्त होऊन मार्गस्थ झाले.

आजपर्यंतच्या आयुष्यात मंदिरातील मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आम्ही कधीच पाहिली नव्हती. काहीतरी विशेष पुण्य गाठीशी होते म्हणून या सुंदर सात्त्विक दिमाखदार सोहळ्याचे आम्ही साक्षीदार होऊ शकलो.

याप्रसंगी सातारचे वेदमूर्ती विवेकशास्त्री गोडबोले यांनी दिलेली प्रतिक्रिया नमूद केल्याशिवाय राहवत नाही, 'आदित्य प्रतिष्ठान, त्याचे अध्वर्यू गुरुदेव दंपती त्यांची सात्त्विक शुचिता, तपसाधना, सामाजिक कार्यामागील त्यांची नि:स्वार्थ तळमळ, त्यातून उभे राहिलेले त्यांचे कार्य, त्या प्रसंगानी निर्माण झालेले हे मंदिर व त्यानिमित्ताने आमच्या करवी होत असलेला गणरायांच्या प्राणप्रतिष्ठेचा हा साग्रसंगीत सोहळा बघून आम्ही असे म्हणतो की, 'उत्तम खेळ होण्याकरता उत्कृष्ट फलंदाजी जर करायची असेल तर सगळ्या खेळाडूंसह मैदानही तसेच असावे लागते. गुरुदेवांच्यामुळे मागील वर्षी लोणावळा येथे संत विद्यापीठाच्या भूमीवर विष्णुयाग करण्याचे व आता हा प्राणप्रतिष्ठापनेचा तीन दिवसांचा शास्त्रशुद्ध सोहळा करण्याचे भाग्य मला लाभले.'

कर्ता करविता तो श्रीआदिगणेशच!

* * *



# ‘इष्टापूर्त’

## (आदिगणेश स्थापनेच्या निमित्ताने)

– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

नवीन वर्षाचे स्वागत करत असताना आदित्य प्रतिष्ठानच्या प्रांगणात इष्ट व आपूर्त दोन्हीची पूर्ती झाली, याचे समाधान मनामध्ये दाटले आहे.

‘इष्टापूर्त’ मधे दोन शब्द आहेत. इष्ट + आपूर्त. हा शब्द फार प्राचीन आहे. ऋग्वेदात तो आढळतो. ‘सं गच्छस्व पितृभि: सं यमेनेष्टापूर्तेन परमे व्योमन्’ (१०.१४८) या मंत्रात त्या शब्दाचा अर्थ– ‘यज्ञ व परोपकारी कृत्ये यांपासून मिळालेले फल किंवा पुण्य’ असा आहे. अथर्ववेदातही अशाच अर्थी ‘इष्टापूर्त’ हा शब्द आलेला आहे.

इष्ट म्हणजे यज्ञयाग आणि आपूर्त म्हणजे जे अशा कृत्यांनी परिपूर्ण भरलेले असते ते.

एकाग्निकर्म हवनं त्रतायां यच्च हूयते ।<br>
अन्तर्वेद्यां च यद्दानमिष्टमित्यभिधीयते ।<br>
वापीकूपतडागानि देवतायतनानि च ।<br>
अन्नप्रदानमाराम: पूर्तमित्यभिधीयते ।

‘गृह्याग्नी व श्रौताग्नी यात केलेल्या हवनाला आणि श्रौतयज्ञात वेदीत केलेल्या दानाला इष्ट असे नाव आहे, तर वापी, कूप, तलाव, मंदिर व अन्न दान करणे व सार्वजनिक उद्याने तयार करणे, यांना आपूर्त असे नाव आहे.’

मंदिर उभारणे, निर्मिणे हे अत्यंत पुण्यदायी कर्म म्हणून हिंदू धर्माने गौरविले आहे. व्यक्तिगत आत्मोन्नतीसाठी इष्ट आणि समाज-राष्ट्राच्या धारणेसाठी आपूर्त (या दोन्हीला मिळून इष्टापूर्त म्हणतात) अशी दुहेरी रचना हिंदू धर्माने सर्वांच्या धारणेसाठी, उन्नतीसाठी, एकात्मतेसाठी, संघटनेसाठी मांडली आहे. चक्रवर्ती सम्राट, राजे-महाराजे, धनिक– या सर्वांनी श्रद्धेने, भक्तीने मंदिरे निर्माण केली आहेत. भारतातील धर्मभावनेचे आणि सांस्कृतिक अधिष्ठानाचे सर्वश्रेष्ठ आणि सुंदर रूप म्हणजे मंदिरच!

**मंदिरांचे पाच प्रकार –**

**१) स्वयंव्यक्त** - मानवाने न घडवलेल्या व ईश्वरी प्रसादाने मूर्त झालेल्या शिवलिंगादी प्रतिमा. ‘भक्तानुकम्पाया देवा: यास्मिन् आविर्भवेत् स्वयम्।’ **२) दैविक** - प्रत्यक्ष विश्वकर्म्याने (देवांचा शिल्पी) निर्मिलेली मंदिरे व देवमूर्ती, **३) आर्ष** - प्राचीन काळी ऋषिमुनींनी, तापसजनांनी उभवलेली, **४) पौराण** - पुराण काळात उभारली गेलेली आणि **५) मानुष** - मानवांनी वा महाराजांनी निर्मिलेली (‘दैविकं चार्षिकं चाऽपि पौराणं मानुषं तथा स्वयंव्यक्तं च पञ्चैव स्थानानि पृथिवीतले।।’’

मंदिराच्या उभारणीसाठी यजमानाने (अर्थात् दानशूराने) ईश्वरसाक्ष संकल्प करावयाचा असतो. त्यानंतर धर्मश्रद्ध, सदाचारसंपन्न, ज्ञानवंत अशा स्थापकाची वा आचार्याची (सत्पात्र ब्राह्मण पुजाऱ्याची) निवड यजमानाने जाणतेपणाने करावयाची असते. मंदिराच्या उभारणीसाठी स्थपती (Architect) अपरिहार्य असतो. त्याच्या मदतीला सूत्रग्राहिन् (सर्वेक्षक), तक्षक (शिल्पी) अर्थात बांधकाम करणारा) आणि वर्धकिन् (मोजमापे व उत्तम मालाची निवड व त्याचा टिकाऊपणा सांगणारा - आधुनिक

काळातील (R.C.C. Consultant)यांची स्थाने महत्त्वाची असतात. मंदिराचा संकल्प केला की यजमानासहित वरील सर्वांना पावित्र्याची, सदाचरणाची शपथ घ्यावी लागते.

'शिलान्यास', आधारशिला, योगनाला (तांब्याची नळी), ब्रह्मशिला, त्यावर प्रत्यक्ष देवतामूर्तीची प्राणप्रतिष्ठा होते. प्रत्यक्ष देवतामूर्तीची प्रतिष्ठापना हा सर्वश्रेष्ठ समारंभ असतो.

मंदिर पूर्वाभिमुख असावे, असा प्राचीन संकेत आहे.

प्रतिष्ठापना या संज्ञेत दोन पदे आहेत– प्रतिष्ठा व स्थापना. प्रतिष्ठापनेनंतरच मंदिरातील पाषाणाला वा धातूला देवपण लाभते. प्रतिष्ठापनेनंतर देवता व अधिष्ठान यांचे अद्वैत सिद्ध होते.

या सर्व गोष्टी सांभाळून आदित्य प्रतिष्ठानच्या पसायदान वास्तूत 'आदिगणेशा'ची स्थापना दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी करता आली हे महद्भाग्य!

* * *



आदित्य प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांसह गुरुदेवांना संकल्पपूर्तीचे समाधान!

## छापता छापता

## आदरणीय लालकृष्ण अडवाणी यांना 'भारतरत्न'





लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न जाहीर.
श्रीराम जन्मभूमीसाठी रथ यात्रा, आंदोलन करणाऱ्या रामभक्तांचा योग्य सन्मान

लालकृष्ण आडवाणींचा जन्म ८ नोव्हेंबर १९२७ ला कराची येथे झाला. ते ९७ वर्षांचे आहेत.

इ. स. १९७७ ते १९७९ या काळात भारताचे माहिती आणि प्रसारणमंत्री तर इ. स. १९९८ ते २००४ या काळात भारताचे गृहमंत्री होते. तसेच ते इ. स. २००२ ते इ. स. २००४ या काळात भारताचे उपपंतप्रधान होते. ते इ. स. १९८९ आणि इ. स. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये नवी दिल्ली लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. इ. स. १९९१ च्या निवडणुकीमध्ये त्यांनी गुजरात राज्यातील गांधीनगर लोकसभा मतदार संघातूनही विजय मिळवला होता.

आडवाणींनी राम मंदिरासाठी मोठा लढा दिला. त्यामुळे त्यांनी २२ जानेवारी २०२४ चे वर्णन 'एक दिव्य स्वप्न की पूर्ती' असे केले आहे.

# 'श्रीरामांचा अतुलनीय त्याग' – नारदीय कीर्तन

सौ. सुलभा श्रीकांत आठवले



कीर्तनात रंगलेले गुरुदेव

दि. २२ जानेवारी २०२४ या दिवशी भारताच्या अस्मितेचा, आत्मगौरवाचा साक्षात्कार भारतालाच नव्हे तर समस्त जगाला झाला. प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते प्रभू श्रीराम अयोध्या येथे सन्मान पूर्वक प्रतिष्ठित झाले.

श्रीराम मंदिर प्रतिष्ठापनेचे निमंत्रण घरोघरी देण्यासाठी अयोध्या नगरीतून अक्षता कलश देशभर सर्वदूर पाठवण्यात आले. घरचाच समारंभ अशा आत्मीयतेने निमंत्रण पाठवण्यास प्रारंभ झाला. रस्तोरस्ती, मंदिरांमध्ये, घरोघरी भगवे ध्वज, पताका, आकाशकंदिल, रंगीत दिव्यांच्या माळा, रांगोळ्या यांची धामधूम उडाली. श्रीरामांचे चरित्रगान करणारी प्रवचने, कीर्तने देशात सर्वत्र आणि सामाजिक माध्यमांमध्ये गाईली जाऊ लागली.

२२ तारखेला आदित्य प्रतिष्ठान आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (कर्वेनगर शाखा) यांनी संयुक्त रितीने, वेदांत नगरी, विशाखा गृहसंकुल, संकेत गृहसंकुल यांच्या परिसरात श्रीरामांच्या स्वागताची जोरदार तयारी केली. ढोलांच्या गजरात, टाळ वाजवत, शंखनाद करत सर्व नागरिकांनी अक्षता- कलशाची थाटात मिरवणूक काढली. सजवलेल्या पालखीतून कलश आणला. 'जय श्रीराम' घोषाने सर्व परिसर दुमदुमला. आदित्य प्रतिष्ठानच्या 'पसायदान' कार्यालयात गणेश मंदिर आणि कलशाला फुलांची सुंदर आरास करून कलश स्थापन करण्यात आला.

अयोध्येत प्रभू श्रीरामांची प्रतिष्ठापना झाल्यावर 'पसायदान सभागृहात' 'श्रीरामांचा अतुलनीय त्याग' हा नारदीय कीर्तनाचा अप्रतिम कार्यक्रम दिमाखात संपन्न झाला.

गुरुदेव अभ्यंकरांनी सीए जितेंद्र अभ्यंकर आणि विद्यावाचस्पती आदित्य अभ्यंकर यांच्या समवेत हे नारदीय कीर्तन करून मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांच्या दिव्य, भव्य, आदर्श चरित्राचे सुंदर दर्शन घडविले.

संवादिनीची साथ सौ. पूनम सोमण यांनी व पखवाज साथ श्री. पार्थ भूमकर यांनी केली. श्री. जयराज केळकरांनी टाळवादन करून गायनासाठी साथ दिली. हे 'कीर्तन' उत्तरोत्तर रंगतच गेले.

कीर्तनाचा प्रारंभ मंगलाचरणाने श्रीगुरु, श्रीगणेश, श्रीविष्णू आणि श्रीदेवी यांच्या स्तोत्रपठणाने केला.

राजाधिराज रामचंद्र महाराजकी जय ।<br>
महारुद्र हनुमान की जय ।

असा गजर करून 'रघुपति राघव राजाराम । पतित पावन सीताराम' हे भजन सर्वांनी सानंद गाईले.

नारदीय कीर्तनाच्या पूर्वरंगामध्ये सेवेचा अभंग होता, समर्थ रामदास रचित,

'आजि आनंदु आनंदु रे ।।ध्रु.।।<br>
नवमी सुदिन आला राम प्रकटला ।<br>
नित्य नवा ब्रह्मानंदु रे ।।<br>
श्रवण मनन निजध्यासे समाधान ।<br>
रामी रामदास निज बोधु रे ।।

आनंद स्वरूप श्रीरामांची थोरवी वर्णन करताना गुरुदेव म्हणाले, वैदिक हिंदू धर्माची परंपरा प्रस्थापित करणारे हे राममंदिर, खरोखरच राष्ट्रमंदिर आहे. या अलौकिक भाग्याचे वर्णन करण्यास शब्द कुठून आणावेत? महर्षी वाल्मीकि आदिकवी आहेत तसेच श्रीराम भारताचा आत्मा आहेत. सायणाचार्य म्हणतात

की जोवर पृथ्वीतलावर पर्वत, नद्या आहेत, सूर्यचंद्र आहेत तोवर ही अलौकिक रामकथा अमर आहे. आपले आयुष्य श्रीरामांनी अंतर्बाह्य व्यापले आहे. राममय आहे. ब्राह्ममुहूर्ताला आपण रामप्रहर म्हणतो. नीरस आयुष्य असेल तर आपण त्याच्या आयुष्यात राम नाही म्हणतो. कुणी भेटल्यावर 'राम राम' म्हणतो. आयुष्याच्या शेवटच्या क्षणी रामांचेच नाव घेतो. शेवटच्या श्वासानंतरही रामनामाचीच सोबत असते. फोनवर पण 'हॅलो' ऐवजी 'रामराम' म्हणा असे गुरुदेवांनी आग्रहपूर्वक सांगितले.

आपण काल्पनिक व्यक्तिंची जयंती साजरी करत नाही. त्रेता युगातील श्रीरामांच्या चरित्राच्या खुणा हिमालयापासून लंकेपर्यंत आजही आहेत. भगवंताच्या अवतारांची जयंती साजरी करतात. जशी रामनवमी, कृष्णाष्टमी, वामन द्वादशी. संतांची पुण्यातिथी साजरी करतात. जशी- नाथ षष्ठी, ज्ञानदेवांची कार्तिक वद्य त्रयोदशी, समर्थ रामदासांची दास नवमी, तुकाराम बीज.

भारतामध्ये १५०० च्या वर रामायणे लिहिली गेली. संस्कृत भाषेमध्ये तर ९३ रामायणे आहेत. प्रादेशिक भाषांमध्येही राम-चरित्र गाईले आहे.

रविंद्रनाथ टागोरांनी श्रीरामांची महती गाईली आहे. अलीकडच्या काळात ग.दि. माडगुळकरांनी लिहिलेल्या गीत रामायणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. संत रामदासांचे तर श्रीराम हे सर्वस्व होते. याठिकाणी समर्थांचे 'राम दाखवा राम भेटवा । कमलनयन सूर्य वदन ।' हे यमनकल्याण रागातील पद सीए जितेंद्र आणि विद्यावाचस्पती आदित्य यांनी सुरेल स्वरांमध्ये गाईले.

जिथे श्रीराम तेथे रावण असतोच. रावणाने देवांनाही धाकात ठेवून कामाला जुंपले होते. यावेळी

समीर लोटतो खडे । वरुण घालतो सडे ।
सती अरुंधती दळी । गणेश खेचरे वळी ।।

या पदातून त्यांनी रावणाचा उद्दामपणा वर्णन केला. परंतु श्रीरामांनी आपल्या अद्‌भुत पराक्रमाने या सर्वांची मुक्तता केली.

रघुनायकासारिखा देव नाही ।
क्रिया पाहता चोखडी सर्वकाही ।।

हे सांगताना गुरुदेव, सीए जितेंद्र आणि विद्यावाचस्पती आदित्य यांनी समर्थांचे 'कथा शंकराची कथा कार्तिकाची --- म्हणोनि कथा थोर या राघवाची। जनी ऐकता शांत होते भवाची ।। हे काव्य गाईले. श्रीरामांचे श्रेष्ठत्व समर्थांच्या मते निर्विवाद आहे.

सीतेने श्रीरामांना वनवासात प्रश्न केला होता की आपले राक्षसांशी वैर नाही मग त्यांना का मारायचे? पण श्रीरामांनी क्षत्रिय राजा या नात्याने सांगितले की राष्ट्रामध्ये कुणाच्याही वाट्याला दु:ख येऊ नये, दु:खाचा उद्गारसुद्धा निघू नये म्हणून त्यांच्या रक्षणासाठी मी हे कोदंड धनुष्य धारण केले आहे. ऋषिकुलाचे रक्षण करणे, क्षत्रिय राजा या नात्याने, माझे कर्तव्य आहे. धर्म स्थापनेसाठी मी शस्त्र धारण केले आहे.

यानंतर गुरुदेव आणि सीए. जितेंद्र आणि विद्यावाचस्पति आदित्य यांनी पूर्वरंगाचा समर्थलिखित अभंग 'आजि आनंदु आनंदु आनंदु रे' याचे सुश्राव्य गायन करून 'पूर्वरंग' समाप्त केला.

कीर्तनाच्या उत्तररंगाचा प्रारंभ करण्यापूर्वी गुरुदेवांनी कीर्तनाच्या नारदीय, वारकरी, रामदासी, दासगणू व गाडगेबाबा या पाच प्रकारांविषयी माहिती दिली.

नारदीय कीर्तनात वैविध्य असते. यात दशकला संगमाची प्रचिती येते. आर्या, साकी, दिंडी, कटाव, कामदा, ओव्या, अभंग, पदे असे सर्व प्रकार गाईले जातात.

यानंतर सर्वांनी कानांना आणि मनालाही अत्यंत आनंद देणारा 'राम राम राम राम सीताराम' हा जयघोष केला.

उत्तररंगासाठी गुरुदेवांनी श्रीरामांच्या जीवनाला कलाटणी देणारा वनवास गमनाचा, त्यांच्या अतुलनीय त्यागाचा प्रसंग निवडला.

रामचरित्राची व्याप्ती विशाल, हिमालयाएवढी, आभाळाएवढी आणि तितकीच सागरासारखी खोलवर. रामचरित्रातील सर्वच प्रसंग उत्कट आहेत.

रामचरित्राचा आठव करताना मन रामरंगात रंगून जाते हे सांगून त्यांनी संत एकनाथ रचित कलावती रागातील, 'मन रामी रंगले, रंगले' ही रागिणी श्री.

जितेन्द्र व श्री. आदित्य यांच्या समवेत मधुर स्वरांमध्ये गाईली.

श्रीराम सत्तावीस वर्षांचे झाल्यावर राजा दशरथाने श्रीरामांना राज्याभिषेक करण्याचे निश्चित केले. हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंत कोसल साम्राज्य पसरले होते. या साम्राज्याच्या शक्तीची लंकाधीश रावणाला पूर्ण कल्पना होती. त्याने अयोध्येवर कधीही आक्रमण करण्याचे धाडस केले नाही. अयोध्येच्या सिंहासनाकडे वाकड्या नजरेने पाहण्याचे धैर्य रावणाकडे नव्हते.

राम व्हावा शुभ चक्रवर्ति राजा ।
जनांसाठी झिजवि देह काजा ।
म्हणुनि राघव रघुकूला कीर्ति ।
रामचन्द्रांची मंगलश्री आरती ।।

या दिंडीचे गायन झाल्यावर गुरुदेवांनी प्रजाजनांच्या मनातील ब्रह्मानंदाचे वर्णन केले. प्रजेचा लाडका श्रीराम राजा होणार असे कळताच सर्वत्र मंगल वाद्ये वाजू लागली. रंगावली, पताका यांनी अयोध्यानगरी सजली. कौसल्येचा आनंद गगनात, मनात मावेना. समर्थांनी हा आनंद फार गोड शब्दांमध्ये सांगितला– 'राम गावा राम ध्यावा । राम जीवींचा विसावा ।।' गुरुदेव, श्री. जितेन्द्र, श्री. आदित्य यांनी बागेश्री रागातील ही रागिणी तितकीच गोड गाईली.

ही आनंदवार्ता कैकेयीची दासी मंथरा, जी गंधार देशातून कैकेयी समवेत अयोध्येला आली होती, हिने ऐकली. तिच्या रागाचा पारा चढला. पाय आपटत ती कैकेयीच्या महालात आली. चिडून तिने कैकेयीला श्रीराम राजा होणार ही तिच्या दृष्टीने भीषण बातमी सांगितली. कैकेयीला श्रीराम प्रिय असल्याने ती अत्यंत आनंदित झाली. मंथरेने संतापून तिला लक्षात आणून दिले की यामुळे तिची सवत कौसल्या राजमाता होईल. कैकेयी तिची दासी होईल. आजपर्यंत कैकेयीमुळे कौसल्येचा जो अपमान झाला, त्याचा ती सूड घेईल. मंथरेच्या मुखातील–

निजलिस का मूर्ख स्त्रिये धन्य होऊन ।
प्राप्त जाहलाचि असे क्षणचि भीषण ।।
सवतिपुत्र होईल तो राम भूपति ।
सेवा तू करशिल गे दिवस नि रात्री ।
जाग जाग अंतरात दक्ष होऊन ।।१।।

या पदातून ही कथा गाईली गेली.

कैकेयी भानावर आली. मंथरेने तिला त्यावर धूर्तपणे एक उपाय सुचवला. ती ओवी अशी–

भोग्यवस्तु ही राजगादी । संपादावी धूर्तीने आधी।
अश्व, गज, रथ नि प्यादी । स्वाधीन करावी ।।

मंथरेने कैकेयीला तिला मिळालेल्या दोन वरांची आठवण करून दिली. मंथरेने तिला एका वराने श्रीरामांना १४ वर्षे वनवास आणि दुसऱ्या वराने भरताला राज्याभिषेक झालाच पाहिजे असे सुचवले.

कैकेयीची विवेकबुद्धी मंथरेमुळे पुरती नष्ट झाली. राजा दशरथाकडे तिने धक्कादायक अशा दोन वरांची मागणी केली. राजाच्या पायाखालची जमीनच सरकली. त्याने कैकेयीजवळ खूप विनवणी केली. भरताला राज्य देतो, पण माझ्या रामाला वनात पाठवू नको अशी वारंवार प्रार्थना केली परंतु कैकेयीचे हृदय द्रवले नाही. दशरथ राजा हतबल झाला. जे श्रीराम एक मुहूर्तानंतर (४८ मिनिटे) कोसल देशाचे सम्राट होणार होते ते एका क्षणात वनवासी झाले. श्रीराम पित्याला भेटायला कैकेयीच्या महालात आले तेव्हा दशरथाची अवस्था पाहून अस्वस्थ झाले. कैकेयी म्हणाली, 'त्यांच्या मनातले सांगायला त्यांना संकोच वाटत आहे.' त्यावेळी श्रीराम म्हणाले, **'तातांच्या मनात जे आहे ते मला सांग, मी ते आचरणात आणेन. राम एकदाच वचन बोलतो. त्यात बदल होत नाही.**

**'तद्ब्रूहि वचनं देवी यद्राज्ञो अभिकांक्षितम्।**
**करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते ।।'**

कैकेयीकडून जेव्हा श्रीरामांना तिचे दोन वर कळले तेव्हा त्यांच्या मुखावर विषादाची रेघही उमटली नाही. असा वाल्मीकि रामायणात उल्लेख आहे. श्रीरामांच्या या संयमाला व त्यागाला सीमा नाही.

श्रीरामांना म्हणूनच आपण एकवचनी, एकबाणी, एकपत्नी व्रत अनुसरणारा आदर्श राजा मानतो. श्रीराम म्हणूनच महान आहेत.

श्रीराम नंतर जनककन्या सीतेला भेटले. मी चौदा वर्षे तातांची वचनपूर्ती करण्यास वनवासात जाणार असे सांगितल्यावर ती म्हणाली, 'तुम्ही थट्टा तर करत नाही? सत्य परिस्थिती कळल्यावर अतिशय शांतपणे सीता श्रीरामांना म्हणाली, 'माझ्या मातापित्याने मला लग्नातच सदासर्वदा तुमच्या पावलांवर चालण्यास सांगितले आहे.' 'जेथे राघव तेथे सीता'. सीतेच्या सतित्वाला, पातिव्रत्याला जगात दुसरे समांतर उदाहरण नाही.

स्वामी विवेकानंद म्हणत, 'एकवेळ दुसरा राम जन्माला येऊ शकेल. परंतु दुसरी सीता निर्माण होणे अशक्य!'

अयोध्यानगरीचे ऐश्वर्य त्यागून रानावनात वल्कले नेसून, कंदमुळे खाऊन, कुठल्याही नगरात न जाता चौदा वर्षे वनवासी होणे, तेही सावत्र मातेच्या वरांसाठी, हा त्याग असामान्य होता.

भरत आजोळहून अयोध्येला परतला तेव्हा सत्य परिस्थिती कळल्यावर त्याने आपल्या जन्मदात्या मातेचा 'माता न तू वैरिणी' म्हणत धिक्कार केला. राजसिंहासन नाकारून श्रीरामांच्या पादुका शिरोधार्य केल्या. त्यांना साक्षी ठेवून नंदीग्राममध्ये राहून भरताने राज्यकारभार केला, तोसुद्धा श्रीरामांसारखे वनवासी बनून, कंदमुळे खाऊन. त्रेतायुगात जीवनमूल्ये किती थोर होती याचे हे आदर्श उदाहरण आहे. कलियुगात एकमेकाच्या उरावर बसून भांडून राज्य हस्तगत केले असते. श्रीरामांचे सर्व भाऊ सावत्र, श्रीरामांना सख्खा भाऊ नाही, पण सावत्र भावांमधली माया, प्रेम आणि सीतेचे पातिव्रत्य यांचे कौतुक कुठल्या शब्दांत करावे?

शंकर रामायणातील ओव्या हे वर्णन फार सुंदर करतात.

'ब्रह्मवाक्याचेही पल्याड। पातिव्रत्याची शक्ती वाड।
सीतारूपी प्रचिती गोड । प्रसङ्गोपात्त ॥१॥'
'स्वजन आणि राष्ट्रासाठी । तीर्थस्वरूप पित्यासाठी।
रामे सावत्र मातेसाठी । त्यागियले सर्व ॥१॥
स्वार्थत्याग हा सर्वश्रेष्ठ । म्हणुनिया राम वरिष्ठ।
भारतगौरवा सुस्पष्ट । दाविले चरित्रे ॥२॥'
'म्हणुनिया श्रीकथा गावी । रघुवीरकथा पूजावी।
श्रीराघवकथा वंदावी । पुन:पुन्हा ॥४॥'

१४ वर्षांचा इतिहास घडून गेला. श्रीराम सीतालक्ष्मणासह अयोध्येला परतले. प्रजाजनांच्या जयजयकारात सिंहासनाधिष्ठित झाले.

श्रीराम अनेक शतकांनंतर पुनश्च अयोध्येला सन्मानाने दि. २२ जानेवारी २०२४ या दिवशी सिंहासनी विराजमान झाले.

भारतातही रामराज्य प्रारंभ होऊन नूतन भारताचा इतिहास सुरू व्हावा अशी रामचरणी मन:पूर्वक प्रार्थना!

भैरवीसाठी तुलसीदासांचे अतिशय गोड भजन गुरुदेव आणि श्री. जितेन्द्र, श्री. आदित्य यांनी निवडले.

'चलो चलो चलो सखी दरसन कर लो
सखियाँ मंगल गावत है ।
सखी रघुनन्दन आवत है ॥ध्रु.॥'

अतिशय गोड स्वरातील या भैरवीने कीर्तनाची सांगता झाली.

'राजाधिराज रामचंद्र महाराज की जय । महारुद्र हनुमानकी जय । जय जय रघुवीर समर्थ । 'राम राम राम राम । सीताराम सीताराम ।'

हा गजर ऐकून मनात आले,
'अनुभवला हा सुखद श्रीरामरंग,
तृप्त होऊन जाती बुद्धी, चित्त, मन,
रामरंग कीर्तन अजोड, बहु गोड,
रामनाम दूर करी अहंकाराचे गारुड'.

* * *



गुरुदेवांचा सन्मान



# विक्रमादित्य डॉ. आदित्य अभ्यंकर

– डॉ. वंदना जोशी

**डॉ. आदित्य अभ्यंकर** यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विश्वविक्रमांची नोंद केली आहे. त्याकरिता विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर (गुरुदेवांचे कनिष्ठ सुपुत्र) यांनी विशेष परिश्रम घेऊन या यशात मोठ्या सक्रिय सहभागाने उत्कृष्ट कामगिरी बजावली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे कौतुक व्यक्त करण्यासाठी ही आनंददायी शाबासकी! आ. पंतप्रधान मोदीजी यांचं वैशिष्ट्य हे की ते कुठल्याही राष्ट्रीय उपक्रमाचे रूपांतर मास मोव्हमेन्टमध्ये करतात.

## राष्ट्रकार्यार्थ विक्रमी चौकार

**१) माझी माती माझा देश –** 'माझी माती माझा देश' या उपक्रमांतर्गत 'सेल्फी विथ मेरी माटी' या अभिनव मोहिमेची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली.

या अभियानात २५ लक्ष पेक्षा जास्त सेल्फी जमा झाले होते, त्याचे अत्यंत क्लिष्ट आणि संगणकीयदृष्ट्या गुंतागुंतीचे (६० मिलिअनपेक्षा अधिक रचना) काम गिनीजच्या निकषांप्रमाणे करण्याचे शिवधनुष्य तंत्रज्ञान विभागाने पेलले. या मोहिमेत तब्बल १० लाख ४२ हजार ५३८ युवक व नागरिकांचे सेल्फी समाविष्ट आहेत.

राष्ट्रधर्म जागविण्याच्या या मोहिमेत तळमळीने व हिरीरीने पुढाकर घेऊन अत्यंत परिश्रम घेतलेल्या डॉ. आदित्य यांचे स्वत: मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेन्द्रजी फडणवीस तसेच मंत्री मा. चंद्रशेखरजी बावनकुळे व मा. राजेश पांडे यांनी कौतुक व अभिनंदन केले.

**२) जी-२० शिखर परिषद –** पुण्यात शिक्षण विषयातील चौथ्या परिषदेचे आयोजन सा. फुले पुणे विद्यापीठात केले गेले. यामध्ये समन्वयक म्हणून राजेश पांडे व नोडल ऑफिसर म्हणून डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी काम पहिले. सा. फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहासातील एक भव्य सोहळा संपन्न झाला. ४ वेगळ्या मिनिस्ट्रीस, ३८ पेक्षा अधिक देशांचे प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळे असा व्यवस्थापनाच्या दृष्टीने आव्हानात्मक उपक्रम तंत्रज्ञानाच्या मदतीने अत्यंत सुसूत्र पद्धतीने राबवण्यात आला. मा. मंत्री धर्मेद्रजी प्रधान, मा. डॉ. सुभाषजी सरकार, मा. अन्नपूर्णा देवी यांनी विशेष कौतुक केले.

**३) हर घर तिरंगा –** मा. पंतप्रधानांच्या तिरंग्यासोबत फोटो काढण्याच्या आवाहनाला नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. २.५ लक्ष पेक्षा अधिक फोटो १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत गुगल फॉर्मच्या साहाय्याने स्वीकारले गेले. १५ ऑगस्टच्या सकाळी गिनीजचे परीक्षक सगळी पाहणी करणार होते. ६ तासात आलेल्या फोटोंचे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टीफिसिअल इंटेलिजन्स) वापरून तांत्रिक काम विक्रमी वेळात पूर्ण केले. तंत्रज्ञान विभागाने पूर्ण केली आणि विद्यापीठासाठी आणि देशासाठी अजून एका गिनीज विश्व विक्रमाची नोंद झाली (आधीचा चीनचा विक्रम मोडल्याने याची गोडी अधिक होतीच).

**४) पुणे पुस्तक महोत्सव २०२३ –**

दि. १४ ते २४ डिसेंबर या कालावधीत वाचकांनी १५ सहस्र पेक्षा जास्त वाचन व्हिडीओ पाठवले. व्हिडीओचे संस्करण अवघड असते व तंत्रज्ञान विभागाने हे काम अत्यंत कमी वेळात यशस्वी करून दाखवले. या व्हिडिओद्वारा डेटा ॲनालिसिस, प्रोसेसिंग, इमेज प्रोसेसिंग, व्हिडिओ प्रोसेसिंग त्यांना शिकता आले व याची नोंद गिनिज विश्वविक्रमात झाली.' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या प्रात्यक्षिकांकडे व अभ्यासपूर्ण अनुभवांकडे सकारात्मक दृष्टिकोन बाळगणाऱ्या डॉ. आदित्य यांचे सर्वांनी मन:पूर्वक अभिनदंन केले.

वरील उल्लेख केलेले विश्वविक्रम आणि अभ्यासपूर्ण व्याख्यान या सर्व कौतुकास्पद कामगिरीसाठी सर्व आदित्यव्रतींकडून डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

* * *



# श्रद्धांजली

## डॉ. प्रभा अत्रे

## (१३-९-१९३२ ते १३-१-२०२४)

किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांचे शनिवार, दि. १३ जानेवारी २०२४ रोजी दु:खद निधन झाले.

९२ वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभलेल्या प्रभाताईंनी शास्त्रीय संगीताला समर्थ योगदान दिले. आयुष्यभर संगीताचे सखोल सर्वांगीण चिंतन करून त्यांनी 'स्वरमयी', 'स्वराली', 'स्वरांगिनी' आणि 'स्वरंजनी' या ग्रंथांची निर्मिती केली. परिपूर्ण नवीन बंदिशी निर्माण केल्या. परदेशी लोकांना अभिजात भारतीय संगीत आणि संगीतकारांची ओळख करून देणारा इंग्रजी ग्रंथही त्यांनी लिहिला. भरतनाट्यम् नृत्यांगना सुचेता भिडे-चापेकर यांच्या 'नृत्य-प्रभा' या नृत्याच्या कार्यक्रमाला त्यांनी संगीत दिग्दर्शन केले. श्री. विजय करंदीकर, श्री. सुरेशबाबू माने, श्रीमती हिराबाई बडोदेकर यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे ज्ञान घेऊन प्रभाताईंनी आपल्या दीर्घ सेवेने ते समृद्ध केले. २००७ पासून मानाच्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात त्यांनी श्रोत्यांना सांगितिक तृप्ती देणारे सांगतेचे सत्र सादर केले. त्यांच्या संगीताच्या सेवेमुळे त्यांना पद्मश्री (१९९०), पद्मभूषण (२००२) आणि पद्मविभूषण (२०२२) असे सन्मान प्राप्त झाले.

**आदित्य प्रतिष्ठानने प्रभाताईंना २०१५ मध्ये 'लक्ष्मी-वासुदेव कलाभूषण' पुरस्कार देऊन त्यांच्या शास्त्रीय संगीतातील कामगिरीचा सन्मान केला होता.** आदरणीय गुरुदेव, सौ. अपर्णाताई आणि प्रतिष्ठानच्या कार्याविषयी त्यांना विशेष आत्मियता होती. **प्रभाताईंच्या नवतीच्या उत्सवात गुरुदेवच मुख्य वक्ते होते.** दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी त्यांना 'अटल संस्कृती गौरव पुरस्कार' प्रदान केला गेला. त्यावेळी 'मी आता थकले' असे उद्गार त्यांनी गुरुदेवांजवळ काढले होते!

आदित्य प्रतिष्ठान परिवारातर्फे कै. प्रभाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली.





सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर लिखित ग्रंथ

श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्र

(सार्थ आणि सविवरण)

डबल क्राऊन पृष्ठे ६२८

छापील देणगी मूल्य रुपये ८००/-

सवलत देणगी मूल्य

रु. ५००/- मात्र

+ कुरियर खर्च रु. १००/-

संपर्क : ८४८४९२११३०

## २२ जानेवारी २०२४ श्रीरामांचे स्वागताचा महासोहळा





## N. B. T. पुस्तकमेळा




N. B. T. अध्यक्ष मराठे, डॉ. पांडे, गुरुदेव, डॉ. आदित्य




आदित्य प्रतिष्ठानचा कक्ष (पुणे पुस्तक मेळा)



भागवतकथा, डोंबिवली

डॉ. आदित्य अभ्यंकर
सा. फु. पुणे विद्यापीठ
तंत्रज्ञान विभागातर्फे
लागोपाठ
तीन गिनीज विश्वविक्रम !
हार्दिक हार्दिक अभिनंदन !!



## आदिगणेश प्रतिष्ठापनेची क्षणचित्रे



वे. मू. विवेकशास्त्री गोडबोले यांचे मार्गदर्शन



प्रतिष्ठापनेचे मंगल कार्य



यज्ञ पूर्णाहूती



यजमान दम्पति



डोळे आले भरून आदिगणेश स्थापिता



श्रद्धेय कार्यकर्ते

LEADERS IN INTERCONNECTION TECHNOLOGY

# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

**Quality Company For Printed Circuit Boards**




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs-Prototype & volumes.
- Metal Clad PCBs for LED Lighting.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks / 0.25 mm Via aholes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing .
- Large Manufacturing Capacity 200,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines.
- Satisfied Customers all over india & abroad.
- CAD-CAM, Prototype, Large scale production under one roof.

## Quality Approvals

**ISO 9001-2008 Certified & UL Approved**


HEAD OFFICE:

**HEAD OFFICE:**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune - 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax: +91 20 6647 1714

**FACTORY:**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli,
Dist. Pune 412 205. (INDIA)Tel.: +91 20 6647 1800
Fax: +91 20 6647 1820

**E-mail:**
info@shogini.com

**Visit us at:**
www.shogini.com

RNI No. MAHMAR / 2010 / 31595
Book packets containing periodicals Price ₹ 20 /-

## `गृहिणी सखी सचिव पुरस्कार' आनंदसोहळा - दि. १४ डिसेंबर २०२३




मानाचा पुरस्कार अपर्णाताईंना प्रदान




सन्मानाला उत्तर देताना सौ. अपर्णाताई

संपादक : सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर
संपादन साहाय्य - सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर, सौ. सुलभा श्रीकांत आठवले, सौ. आरती आदित्य अभ्यंकर
यांनी हे त्रैमासिक प्रकाशक, मुद्रक, मालक आदित्य प्रतिष्ठान,
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-५२ येथून प्रकाशित केले.
मोबाईल नं. : 8484921130
aditya.pratishthan25@gmail.com / www.adityapratishthan.org.in

BOOK-POST